सन २०१७-१८ मधील अर्थसंकल्पीत तरतूदीचे
वितरण करणेबाबत..
“सहकारी सूतगिरण्यांना वित्तीय संस्थांकडून
मिळणा-या कर्जावरील व्याजाचे प्रदान”

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. सूतगि- ३३१७/प्र.क्र.७६/टेक्स-१ (ब)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २८ मार्च, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. धोरण- १०१६/प्र.क्र.९६/टेक्स-१ (अ), दिनांक ११ जानेवारी, २०१७.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग,क्र. संकीर्ण- २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दिनांक १० मे, २०१६.
३) शासन परिविपत्रक, त्त विभाग,क्र. अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल,२०१७.
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जून, २०१७.
५) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्र. शासन निर्णय, क्र. अर्थसं-१७१७/ प्र.क्र.१३/टेक्स -१ (ब), दि. ५ जुलै, २०१७.
६) शासन परिपत्रक,वित्त विभाग, क्र. पूरक-२०१७/ प्र.क्र.३३५/अर्थसंकल्प-३, दि.२९ डिसेंबर, २०१७.
७) शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक पूरक-२०१७/प्र.क्र.१२९/१७-स, दिनांक ११ जानेवारी, २०१८.
८) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना:-

शासन निर्णय, क्र. धोरण-१०१६/प्र.क्र.९६/टेक्स-१ (अ), दि. ११ जानेवारी, २०१७ अन्वये, सहकारी सूतगिरण्यांना वित्तीय संस्थांकडून / रा. स. वि. म. कडून रु. ३,०००/- प्रति चाती प्रमाणे ५ वर्षांच्या मुदतीसाठी कर्ज घेण्यास परवानगी देण्यात आली असून सदर कर्जावरील ५ वर्षांचे कमाल १२ % पर्यंतचे व्याज शासन भरणार आहे. ज्या सहकारी सूतगिरण्यांनी यापूर्वी शासनाकडून घेतलेल्या बिनव्याजी कर्जाची परतफेड केली आहे, अशाच सूतगिरण्या ह्या योजनेसाठी पात्र समजण्यात येतील. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित वित्तीय संस्थांनी सहकारी सूतगिरण्यांना दिलेल्या कर्जावरील व्याजाचे प्रदान करण्यासाठी संदर्भ क्र. ४ येथील दि. ५ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये “मागणी क्र. व्ही-१ अंतर्गत “वित्तीय संस्थांकडून मिळणा-या कर्जावरील व्याज” (अनिवार्य) या नवीन योजनेसाठी “२०४९- व्याज प्रदाने, ०१- देशांतर्गत ऋणावरील व्याज, २००- देशांतर्गत इतर ऋणांवरील व्याज, (०२), इतर संस्थांकडून मिळणा-या कर्जावरील व्याज (२) (०६) वित्तीय संस्थांकडून मिळणा-या कर्जावरील व्याज (२०४९ २५५१)” हे नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्यात आले असून संदर्भ क्र.५ येथील दि. २९.१२.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये डिसेंबर, २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे रु.१२,३३,४०,०००/- (रुपये बारा कोटी तेहतीस लाख

चाळीस हजार फक्त) इतकी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यासंदर्भात विभागाकडे सूतगिरण्यांकडून / वित्तीय संस्थांकडून प्राप्त झालेल्या व्याजप्रदानाबाबतच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने संबंधित वित्तीय संस्थांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अनुज्ञेय व्याजाचे प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन निर्णय, क्र. धोरण-१०१६/प्र.क्र.९६/टेक्स-१ (अ), दि.११ जानेवारी, २०१७ अन्वये शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन खालील तक्त्यात दर्शविलेल्या सहकारी सूतगिरण्यांच्या नावासमोरील स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविलेल्या बँकांना स्तंभ क्र.६ मध्ये दर्शविलेल्या व्याजाच्या रकमेचे प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर तक्त्यातील सूतगिरण्यांनी थकित बिनव्याजी कर्जाची परतफेड केली आहे याबाबतची खातरजमा करुन घेऊन त्यांना सदर व्याजाचे प्रदान करण्यात येत आहे.

तक्ता

अ. क्र.	सूतगिरणीचे नाव	चात्यांची संख्या	बिनव्याजी कर्ज घेतले होते काय ? असल्यास त्याची परतफेड केली आहे का?	चात्यांच्या प्रमाणात कोणत्या वित्तीय संस्थेकडून /रा.स. वि. नि. कडून किती कर्ज घेतले आहे, व्याजाचा दर, बँकेचा खाते क्रमांक व IFSC Code	१२% पर्यंतच्या व्याजाची रक्कम व व्याजाचा कालावधी
१	२	३	४	५	६
१	कृष्णा वेरळा मागास वर्गीय सहकारी सूतगिरणी , पलूस, जि. सांगली	२५०५६ चात्या	होय. रु.२,३१,४७,१५६/- संपूर्ण रक्कम परत फेड केली आहे.	रु.७५१.६८ लाख सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक लि., सांगली-- **१२%** खाते क्रमांक - 10505080000196 IFSC Code - IBKL0487SDC	रु.९०,३४,९८७/- (दि.३०.३.२०१७ ते ३१.३.२०१८)
२	सागरेश्वर सहकारी सूतगिरणी, कडेगांव, सांगली	४२०४८ चात्या	होय. रु.३,६५,६५,१९५/- संपूर्ण रक्कम परत फेड केली आहे.	रु.१२६१.४४ लाख सांगली जि.मध्य. सह.बँक लि., सांगली -- **१२%** खाते क्रमांक 10505080000196 IFSC Code - IBKL0487SDC	रु.१,५१,९५,३४१/- (दि.३०.३.२०१७ ते दि. ३१.३. २०१८)

३	रामानंद भारती सहकारी सूतगिरणी , तासगाव, सांगली	२२२२४ चात्या	होय. रु.२,५७,०७,३२६/- संपूर्ण रक्कम परत फेड केली आहे.	रु. ६६६.७२ लाख सांगली जि.मध्य. सह.बँक लि., सांगली -- **१२%** खाते क्रमांक - 10505080000196 IFSC Code - IBKL0487SDC	रु.८०,४८,८६४/- (दि.२८.३.२०१७ ते दि. ३१. ३. २०१८)
४	जवाहर सहकारी सूतगिरणी मर्या., चांदूर रेल्वे, अमरावती.	२३७१२ चात्या	बिनव्याजी कर्ज घेतलेले नाही.	रु.७११.३६ लाख पंजाब नॅशनल बँक, शाखा खामला, नागपूर- **११.७०%** खाते क्रमांक - 1472003171160 IFSC Code - PUNB0147200	रु.३९,१५,६२२/- (दि.४.९.२०१७ ते दि. ३१.३. २०१८)
५	अण्णाभाऊ आजरा तालुका शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., आजरा, जि.कोल्हापूर	२२७०४ चात्या	होय. रु.२,३४,५८,७२९/- संपूर्ण रक्कम परत फेड केली आहे.	रु. ६८१.०० लाख दि फेडरल बँक लि., शाखा गडहिंग्लज - **१२%** खाते क्रमांक - 16560051030001 IFSC Code- FDRL0001656	रु.६८,७०,८६०/- (दि.३०.५.२०१७ ते दि. ३१.३. २०१८)
६	श्री. व्यंकटेश शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी मर्या., इचलकरंजी, जि. कोल्हापूर	१३११६ चात्या	होय. रु.४०,११,६००/- संपूर्ण रक्कम परत फेड केली आहे.	रु. ३९३.४८ लाख कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर शाखा - **१३%** खाते क्रमांक- 046010001100018 **IFSC Code -** IBKL0463KDC	रु.२५,४८,४५६/- (दि.१६.९.२०१७ ते दि.३१.३. २०१८)
७	बॅरिस्टर शेषराव वानखेडे शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., मोहगांव (बुटीबोरी), नागपूर	५८४६४ चात्या	होय. रु.३,४७,५४,४८८/- संपूर्ण रक्कम परतफेड केली आहे.	रु. १७५३.९२ लाख पंजाब नॅशनल बँक, खामला शाखा, नागपूर - **१२%** खाते क्रमांक - 1472003171160 **IFSC Code -** PUNB0147200	रु.२,५०,८३,४६०/- (दि.२१.१.२०१७ ते दि. ३१.३. २०१८)

८	बाबासाहेब नाईक कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी मर्या., पिंपळगांव (कान्हा), यवतमाळ	२५१५२ चात्या	होय. रु.१,४३,२२,९४०/- संपूर्ण रक्कम परतफेड केली आहे.	रु. ७५४.५६ लाख - National Co-operative Development Corporation, Commercial Branch, New Delhi -- **१०.९०%** चालू खाते क्रमांक - 32164052874 **IFSC Code -** SBIN0004298	रु.६१,७९,५६१/- (दि.११.५.२०१७ ते ४.३.२०१८)
९	हुतात्मा स्वामी वारके सहकारी सूतगिरणी, भुदरगड, जि. कोल्हापूर	१३७२८/- चात्या	होय. रु.१,०२४४,८१२/- संपूर्ण रक्कम परतफेड केली आहे.	रु. ४११.०० लाख कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर शाखा - **१२%** खाते क्रमांक- 011710001100061 **IFSC Code** – IBKL0463KDC	रु. १०,१०,३३४/- (२.१.२०१८ ते ३१.३.२०१८)
	एकूण रु. सात कोटी अठ्ठयाहत्तर लाख सत्त्याऐंशी हजार चारशे पंच्याऐंशी फक्त				**रु.७,७८,८७,४८५/-**

२. वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ६.२.२०१८ मधील परिच्छेद-२ व उपपरिच्छेदात नमूद केल्यानुसार, “४५- व्याज” या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले आहेत. तसेच वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १७.४.२०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ पैकी ९, ११, १२, १३, १४, १५, १६, १७ व १८ मधील तरतूदी या प्रकरणी लागू नाहीत. परिच्छेद ७अ, ७ब, ७क, व ८मधील तरतूदी या प्रकरणी लागू असून सदर तरतुदींची खालीलप्रमाणे पूर्तता होत आहे-

(७-अ) एखाद्या योजनेस / प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे :- सहकारी सूतगिरण्यांनी वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जावरील १२% पर्यंतच्या व्याजाचे प्रदान संबंधित वित्तीय संस्थांना करण्याबाबत मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दि. ११ जानेवारी, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(७-ब) नियतव्यय उपलब्धता :- डिसेंबर, २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे रु.१२,३३,४०,०००/- इतका निधी विभागाच्या “२०४९ २५५१” या लेखाशीर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(७-क) व ८) विभागास प्रदान वित्तीय अधिकार :- वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं- २०१७/ प्र. क्र. ७५/अर्थ-३, दि. ६.२.२०१८ मधील परिच्छेद-२ च्या उपपरिच्छेदात नमूद केल्यानुसार "४५- व्याज" या बाबीखालील खर्च करण्यास विभागास वित्तीय अधिकार प्राप्त आहेत.

तसेच वित्त विभागाच्या दिनांक १८.४.२०१७ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील अ. क्र. ७ येथील "४५- व्याज" या बाबीखालील खर्च करण्यास वित्त विभागाच्या शासन परिपत्रक, दि. ६.२.२०१८ अन्वये विभागास वित्तीय अधिकार प्राप्त आहेत.

३. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद- अ) नुसार प्रस्तुत प्रकरणाची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

१) विभागास प्रदान वित्तीय अधिकार:- वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं- २०१७/ प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. ६.२.२०१८ अन्वये "४५-व्याज" या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले आहेत.

२) मंजूर निधी :- "मागणी क्र. व्ही-१ "वित्तीय संस्थांकडून मिळणा-या कर्जावरील व्याज" (अनिवार्य) २०४९- व्याज प्रदाने, देशांतर्गत ऋणावरील व्याज, २००- देशांतर्गत इतर ऋणांवरील व्याज (०२), इतर संस्थांकडून मिळणा-या कर्जावरील व्याज (२) (०६) वित्तीय संस्थांकडून मिळणा-या कर्जावरील व्याज (२०४९ २५५१)" भारित ४५- व्याज" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात डिसेंबर, २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे रुपये १२,३३,४०,०००/- (रुपये बारा कोटी तेहतीस लाख चाळीस हजार फक्त) इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर संपूर्ण निधी अद्याप अखर्चित आहे.

३) मागील ३ महिन्यांपूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे:- लागू नाही.

४) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यांत येत आहे, त्या लेखाशीर्षांतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही:- सन २०१७-१८ मध्ये प्रथमच सहकारी सूतगिरण्यांनी वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या १२% पर्यंतच्या व्याजाचे प्रदान करण्यात येत असल्याने या योजनेखाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली १ वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देतांना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यांत आली आहे:- लागू नाही.

६) वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करतांना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे:- लागू नाही.

७) बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देतांना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा:- लागू नाही.

८) खरेदी विषयक प्रक्रिया संबंधित अद्यावत शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा:- लागू नाही.

९) साहित्य खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे आहरीत करावी :- लागू नाही.

४. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद- ब) मधील २) नुसार, वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ च्या परिशिष्टातील अनु. क्र. २, ३, ४, ५, ६, व ८ या प्रकरणी लागू नाहीत व परिशिष्टातील अ.क्र. १ बाबत नमूद करण्यात येते की, सदर योजना ही नवीन अनिवार्य स्वरुपाची योजना असून वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३३८/अर्थ-१२/१७, दि. २१.११.२०१७ नुसार वित्त विभागाने डिसेंबर, २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे रु. १२,३३,४०,०००/- इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

५. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद-ब मधील ३ नुसार, वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.४.२०१७ सोबतच्या परिशिष्टातील अनु. क्र. ३ तसेच ८ मधील तपासणी सुचीमधील बाबी या प्रकरणी लागू नाहीत.

६. यासाठी होणारा खर्च " मागणी क्र. व्ही-१ "वित्तीय संस्थांकडून मिळणा-या कर्जावरील व्याज" (अनिवार्य) २०४९- व्याज प्रदाने, देशांतर्गत ऋणावरील व्याज, २००- देशांतर्गत इतर ऋणांवरील व्याज (०२), इतर संस्थांकडून मिळणा-या कर्जावरील व्याज (२) (०६) वित्तीय संस्थांकडून मिळणा-या कर्जावरील व्याज (२०४९ २५५१)" भारित ४५- व्याज" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्वारे मंजूर केलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

७. संचालक वस्त्रोद्योग, नागपूर यांनी संबंधित सूतगिरण्यांनी वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जावरील यापुढील कालावधीसाठी देय होणा-या व्याजप्रदानाचा तिमाही अहवाल शासनास सादर करावा.

८. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेली रु.७,७८,८७,४८५/- (रुपये सात कोटी अठ्ठयाहत्तर लाख सत्त्याऐंशी हजार चारशे पंच्याऐंशी फक्त) इतकी रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून आहरीत करुन उपरोक्त परिच्छेद-१ मधील तक्त्यातील स्तंभ ६ मधील व्याजाची रक्कम स्तंभ क्र.५ मध्ये नमूद केलेल्या वित्तीय संस्थांच्या संबंधित खाते क्रमांकांमध्ये RTGS द्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करण्याकरीता श्री. र. गं. बोड्डू, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२ यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, श्री. ब. बा. चव्हाण, सह सचिव (सूतगिरणी), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२ यांना "नियंत्रण अधिकारी"म्हणून घोषित करण्यात येत आहे.

९. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेला निधी संबंधित बँका / वित्तीय संस्थांना वितरीत केल्यानंतर आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर रकम प्राप्त झाल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित वित्तीय संस्थांकडून प्राप्त करुन घ्यावे व त्याची प्रत शासनास सादर करावी.

१०. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. ७ येथील दि.६.२.२०१८ च्या परिपत्रकातील परिच्छेद-२ मधील उपपरिच्छेदातील बाबींनुसार विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१९३२४९५६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Vishal Vishvas Madane

Digitally signed by Vishal Vishvas Madane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-op Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bb0ed28a897fc87f69fe8807b3d9428966ce3233edb83a20c38834c19f2e3793, cn=Vishal Vishvas Madane
Date: 2018.03.28 19:36:28 +05'30'

(विशाल मदने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) महालेखाकार, महाराष्ट्र- १, (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षा), मुंबई/ नागपूर.
२) मा. मंत्री (वस्त्रो.) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
३) संचालक वस्त्रोद्योग, नागपूर.
४) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

७) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
८) सहसंचालक, लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,नवीन प्रशासन भवन,मंत्रालय,मुंबई
९) सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहायक, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प -३ व १३, मंत्रालय, मुंबई
११) अवर सचिव (कार्यासन १७ स), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) शाखा व्यवस्थापक, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक लि., सांगली
१३) शाखा व्यवस्थापक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर.
१४) शाखा व्यवस्थापक, पंजाब नॅशनल बँक, शाखा खामला, नागपूर
१५) शाखा व्यवस्थापक, दि फेडरल बँक लि., शाखा गडहिंग्लज, कोल्हापूर.
१६) शाखा व्यवस्थापक, दि फेडरल बँक लि., शाखा भुदरगड, कोल्हापूर.
१७) नॅशनल को-ऑप. डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, कमर्शियल ब्रँच, नेहरु प्लेस, नवी दिल्ली.
१८) सर्व संबंधित सहकारी सूतगिरण्या.
१९) कार्यासन अधिकारी, (रोख शाखा), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई (३ प्रती)
२०) निवड नस्ती (टेक्स-१ (अ) / टेक्स-१ (ब)).